प्र. कोर्ट प्रत.

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी
**P.S.(ठाणे):** मानवत

**Year (वर्ष):** 2025

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0436

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/11/2025 23:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 04/11/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/11/2025
   **Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:18 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 04/11/2025
   **Time (वेळ):** 23:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 028
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/11/2025 23:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 4 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** खरबा ग्रामपंचायत कार्यालय, खरबा,मानवत

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** महेश मारूती पाटणकर पोलीस उप अधीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,परभणी,परभणी,मानवत,परभणी,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,परभणी,परभणी,मानवत,परभणी,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870313157

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश रंगनाथराव मुळे ग्रामपंचायत अधिकारी खरबा | | | 1. राहुल नगर, परभणी,परभणी, मोंधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 2 नोटा | 1,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकारतर्फे फिर्याद दिनांक 04/11/2024.

मी महेश मारूती पाटणकर वय 53 वर्ष पद पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी मोनं. 9870313157.

सरकारतर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी दि. 29/05/2025 पासुन पोलीस उप अधीक्षक, म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे नेमणुकीस आहे.

दि. 03/11/2025 रोजी लाचलुचपत कार्यालय, परभणी येथे हजर असतांना तक्रारदार अर्जुन लक्ष्मणराव निर्मळ वय 30 वर्ष व्यवसाय मजुरी रा. खरबा ता मानवत जि परभणी यांनी त्यांचे मों.नं. 9309985173 वरुन का◌ॅल करुन तक्रार दिली की, त्यांची पत्नी कै. सोनाली अर्जुन निर्मळ हिचा आजारा दरम्यान दि. 22/02/2025 रोजी मृत्यु झाला आहे. त्याबाबत खरबा ग्रामपंचायत येथे नोंद करून ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांचेकडुन दि. 23/10/2025 रोजी मृत्यु प्रमाणपत्र घेतले आहे. त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर लगेच 500/-रूपयेची मागणी केल्याने नाईलास्तव रक्क्म दिली आहे. त्यानंतर दि. 28/10/2025 रोजी ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी त्यांचे मोबाईल नंबर 9404514047 वरुन तक्रारदार अर्जुन लक्ष्मणराव निर्मळ यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9309985173 वर का◌ॅल करून मी तुझे पत्नीचे मृत्यु प्रमाणपत्र दिले आहे. त्याबद्दल मला खर्च पाणी दे असे म्हणुन 500/-रूपयेची मागणी केली. तक्रारदार अर्जुन निर्मळ यांना ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी मागितलेली 500/-रूपये रक्कम हि लाच आहे. तक्रारदार अर्जुन निर्मल यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांचेवर दिनांक 04/11/2025 रोजी तक्रार घेवुन ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांचेवर कार्यवाही करण्याबाबत विनंती केली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 03/11/2025 रोजी विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण विभाग, परभणी या कार्यालयात पत्र देवुन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत माहिती देवुन दिनांक 04/11/2025 रोजी तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे तक्रार घेवुन कार्यवाही करणे असलेबाबत सांगितले.

दिनांक 04/11/2025 रोजी तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहन व मोटारसायकलसह सापळा कार्यवाहीसाठी लागणा-या किट साहित्यासह मानवत शहराचे अलीकडे एका शेतात आडोशाचे ठिकाणी थांबलो. काही वेळाने तक्रारदार अर्जुन निर्मळ त्यांची मोटारसायकल सह आले. सदर ठिकाणी तक्रारदार यांची लेखी तक्रार घेवुन तक्रारीची खात्री करुन आम्ही व पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/कदम यांनी तक्रारदार अर्जुन निर्मळ व दोन्ही पंचांना व्हाईस रेका◌ॅर्डर व वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती देवुन व्हाईस रेका◌ॅर्डर सुरू करून आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य व्हाईस रेका◌ॅर्डर व्दारे नविन मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर सदर व्हाईस रेका◌ॅर्डर 13◌ः37 वाजता चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आतुन टाकुन त्यांचे सोबत पंच क्र. 1 खुपसे यांना ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) यांची भेट घेण्यासाठी खरबा ग्रामपंचायत कार्यालय, ता मानवत या ठिकाणी पडताळणी कार्यवाही करीता मोटार सायकलने रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 खुपसे हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि/कदम यांनी तक्रारदार निर्मळ यांचेकडुन व्हाईस रेका◌ॅर्डर काढुन 14◌ः05 वाजता बंद केला. आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 खुपसे यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार व पंच क्र 1 खुपसे यांनी त्याबाबत माहिती दिली. त्यावरुन पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांची भेट झाली. सदर भेटी दरम्यान तक्रारदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांना दि. 28/10/2025 रोजी मोबाईलवर का◌ॅल वर झालेल्या चर्चेबाबत विषय काढुन त्यावेळी तक्रारदार यांचेकडे पैसे

नसल्याने ते भेटण्यास आले नव्हते असे सांगितले. त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी काय दयायचे ते दे तुझ्या मनाने दे असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा विचारणा केली. तेव्हा मुळे यांनी 1000/- रूपयेची लाचेची मागणी केली. तसेच दिवाळी असल्याने तुझ काम चार दिवस उशिरा झाले असे सांगितले. त्यावरून ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी तक्रारदार यांना त्यांचे पत्नीचे मृत्यु प्रमाणपत्र दिल्याबाबत बक्षिस स्वरूपात 1000/-रूपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

तक्रारदार अर्जुन निर्मळ यांना ग्रामपंचायत अधिकारी मुळे बक्षिस स्वरुपात 1,000/-रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी त्यांचे कडील 500/- रूपयाचे दराच्या 02 नोटा एकुण 1000/-रूपये पंचा समक्ष सापळा कार्यवाही करता आमचेकडे जमा केले. त्यानंतर शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही सुरू केली. आमचे सुचनेप्रमाणे पोह/आदमे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष किट मधुन अॅथ्राॅसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प काढुन त्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना माहिती देवुन प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यांनतर आम्ही सापळा कार्यवाही अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या. तक्रारदार व पंच क्र 1 खुपसे यांना ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कार्यालयाचे बाहेर येवुन हातरूमाल काढुन चेहरा पुसण्याचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे पोह/आदमे यांनी तक्रारदार अर्जुन निर्मळ यांनी त्यांचे 500/- रूपयाचे दराच्या 02 नोटा एकुण 1000/-रूपये जमा केलेल्या नोटांना अॅथ्राॅसिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजव्या खिशात अलगत ठेवुन दिले. त्यानंतर पोशि/कदम यांनी व्हाइस रेकाॅर्डर 15ः00 वाजता सुरू करून तक्रारदार यांचे टिशर्टच्या आतुन गळयात लटाकवुन देवुन पंच क्र 1 खुपसे यांचेसोबत मोटारसायकलने ग्रामपंचायत कार्यालय, खरबा येथे पाठविण्यात आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र 2 व सापळा पथक असे शासकीय वाहन व मोटारसायकलने गेलो.

तक्रादार यांनी त्यांची मोटारसायकल खरबा ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावुन पंच क्र 1 खुपसे यांचेसह आतमध्ये गेले. त्यामुळे सापळा पथक आजुबाजूस तक्रारदार यांचे इशारा पाहण्यासाठी थांबले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र 1 खुपसे हे कार्यालयाचे बाहेर आले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेकडील रुमाल तोंडाला पुसून लोकसेवकाने लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन लागलीच आम्ही व सापळा पथक तक्रारदाराजवळ पोहचलोत. त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी मुळे यांनी तक्रारदार हे बाहेर आल्याचे पाहिले व त्याचे पाठोपाठ येवुन त्यांचे टिशर्टचे वरच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम 1000/-रूपये ग्रामपंचायत कार्यालयाचे उजवे भिंतीचे लगत जमीनीवर फेकुन दिले. सदर रक्कम आम्ही पंचासमक्ष जप्त केली आहे. त्यादरम्यान पोशि/कदम यांनी तक्रारदार यांचे कडील व्हाईस रेकाॅर्डर 15ः18 वाजता बंद केले. सदर सापळा कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला आहे.

तरी दि. 04/11/2025 रोजी तक्रारदार अर्जुन लक्ष्मणराव निर्मळ वय 30 वर्ष व्यवसाय मजुरी रा. खरबा ता मानवत जि परभणी यांनी दिलेल्या तक्रारी वरून पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक रमेश रंगनाथराव मुळे, ग्रामपंचायत अधिकारी, खरबा ग्रामपंचायत ता. मानवत यांनी तक्रारदार यांचे पत्नीचे मृत्यु प्रमाणपत्र दिले म्हणुन पंचासमक्ष बक्षीस स्वरूपात लाचेची मागणी केली. त्यानंतर खरबा ग्रामपंचायत कार्यालय येथे 15ः00 ते 15ः18 दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही आरोपी लोकसेवक रमेश रंगनाथराव मुळे, ग्रामपंचायत अधिकारी, खरबा ग्रामपंचायत ता. मानवत यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन 1,000/- रुपये लाचरक्कम स्विकारली.

म्हणुन माझी आरोपी लोकसेवक रमेश रंगनाथराव मुळे वय 50 वर्ष पद ग्रामपंचायत अधिकारी, खरबा ग्रामपंचायत ता. मानवत जि. परभणी यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

sandip anandrao borkar(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

दिगांबर पांडुरंग पाटील
पोलीस उपनिरिक्षक
पोलीस स्टेशन, मानवत

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** sandip anandrao bo

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):**